# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. १० /२०२६**

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागप्रमुख/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ करिता सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) पदे भरण्याकरीता प्रक्रिया सुरु करावयाची आहे. त्या अनुषंगाने अशा प्रकारच्या पदांच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्वकक्ष सुधारित धोरण (अर्ज मागविण्याची प्रक्रिया, निवड प्रक्रिया, मुलाखतीच्या गुणांकनाची प्रक्रिया, आरक्षण, गुणवत्ता व निवड यादीची प्रक्रिया इत्यादी) निश्चित करण्याकरिता मा.कुलगुरू यांनी समिती गठित केलेली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालास मा.कुलगुरु यांनी मा.व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर अहवालातील शिफारशी खालीलप्रमाणे आहेत:-

**१. समितीच्या शिफारसी :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागातील प्राध्यापकांची संख्या कमी झाल्याने तासिका तत्त्वावर अभ्यागत प्राध्यापकांची विषयनिहाय नियुक्ती करावी लागते. सदर प्राध्यापक विभागात इतर बाबींसाठी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पूर्णवेळ शिक्षकांइतके मार्गदर्शन मिळण्यास मर्यादा येतात. त्यामुळे नियमित शिक्षक भरती होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात त्या-त्या शैक्षणिक वर्षाकरिता केवळ अध्यापन व विद्यार्थी मार्गदर्शन या मर्यादित बाबींची पूर्तता तातडीची बाब म्हणून करण्यासाठी सहायक प्राध्यापक (करारपध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) या पदांची त्या-त्या शैक्षणिक वर्षात मा.व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने निर्मिती करण्यात यावी.

विभागाची अध्यापनाची गरज भागविण्यासोबतच भविष्यात शिक्षकीय पेशात नियमित शिक्षक म्हणून येऊ इच्छिणाऱ्या गुणवत्ताधारक तरुणांना विद्यापीठ स्तरावर अध्यापनांची संधी मिळून भविष्यातील विविध महाविद्यालये / विद्यापीठ शिक्षक भरतीसाठी उत्कृष्ट उमेदवार उपलब्ध व्हावेत, हा या धोरणाचा हेतू आहे.

२) पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :

१. विभागामध्ये अध्यापन करणे व विभागाच्या प्रशासकीय कामकाजात मदत करणे.
२. विभागातील इतर नियमित कार्यरत शिक्षकांप्रमाणे संशोधन अथवा शिक्षण-विस्तार या बाबत अनिवार्यता नसेल.
३. अध्यापनाचा कार्यभार १६ तास प्रति आठवडा असा राहील.
४. विभागप्रमुखांच्या आदेशानुसार विभागाच्या अन्य कामकाजात सहभागी होणे आवश्यक आहे.

३) सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) या पदाची कर्तव्ये/जबाबदाऱ्या ही नियमित शिक्षकीय पदांपेक्षा वेगळी असल्याने विभागाच्या त्या-त्या शैक्षणिक वर्षातील विषयांची गरज विचारात घेता त्याची पूर्तता होण्याच्या दृष्टीने विभागप्रमुखांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या स्तरावर निवड समिती असावी.

४) संबंधित विभागप्रमुख हे नियुक्ती व शिस्त विषयक प्राधिकारी राहतील.

५) निवड झालेल्या उमेदवारांना विभागाच्या स्तरावर विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने नियुक्ती आदेश देण्यात यावेत.

६) रुजू झालेल्या उमेदवारांनी बायोमॅक्ट्रीक्स पध्दतीने दैनंदिन हजेरी नोंदवणे आवश्यक राहील.

७) सदर उमेदवारांना त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीनुसार दरमहा निर्धारित एकत्रित मानधन अदा करण्यात यावे.

८) महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणाविषयक प्रचलित धोरणांचे पालन करावे.

९) सदर उमेदवारांना 'शिक्षक' या नात्याने विभागातील इतर शिक्षकांप्रमाणे सन्मानाची वागणूक मिळेल, हे विभागप्रमुख सुनिश्चित करतील.

१०) उपरोक्त पदांचे सर्वस्वी स्वरुप हे विद्यापीठातील शासनमान्य शिक्षकीय पदांच्या स्वरुपापेक्षा वेगळे असून शासनमान्य पदांच्या भरतीचे धोरण या पदांना लागू करणे उचित होणार नाही. त्यामुळे या तात्पुरत्या पदांची भरती सदर अहवालात नमूद धोरणाव्दारे करण्यात यावी.

११) उमेदवाराची नियुक्ती संपुष्टात आल्यानंतर विभागप्रमुख विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात अनुभवाचे प्रमाणपत्र उमेदवाराच्या विनंतीवरुन देतील.

**२. पद भरण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे :**

१) करार पध्दतीने भरण्यात येणाऱ्या सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) यांना दरमहा **रु. ५०,०००/- इतके एकत्रित मानधन** देण्यात यावे.

२) सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) Assistant Professor (Contractual)) यांना प्रति महिना 'एक' किरकोळ रजा देय राहील, तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या रजा लागू राहणार नाहीत. यासोबतच या पदांना हिवाळी व उन्हाळी सुट्ट्या (Vacation) देय राहणार नाहीत. विभागामध्ये विभागप्रमुखांच्या सुचनेनुसार त्यांना सदरच्या कालावधीमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

३) सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) या पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने व इतर तत्सम शिखर संस्थेने व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली शैक्षणिक व इतर अर्हता लागू राहील.

४) सदर पद भरण्यासंदर्भातील निवड समितीची कार्यवाही संबंधित शैक्षणिक विभागाकडून करण्यात यावी.

**३. निवड प्रक्रिया :**

**१) निवड समितीः**

- सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) या पदाच्या निवडीकरिता संबंधित शैक्षणिक विभागाच्या स्तरावर खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्यात यावी.

१. संबंधित विभागाचे विभागप्रमुख, **अध्यक्ष.**

२. मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले संबंधित विषयाचे दोन विषयतज्ज्ञ.
   - विभागप्रमुख यांनी शिफारस केलेल्या विषयतज्ज्ञांच्या यादीमधून

३. मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गीय प्रवर्गातील एक सदस्य.

४. मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेला मा.व्यवस्थापन परिषदेतील एक सदस्य.

**(निवड समितीच्या बैठकीकरिता गणपूर्ती किमान तीन सदस्यांनी मिळून होईल. यातील १ विषय तज्ज्ञ आणि १ आरक्षण प्रतिनिधी उपस्थितीत असणे आवश्यक.)**

**२) निवड प्रक्रिया :**

१. सदर पद हे विशेष उद्दिष्टाने निर्माण केलेले तात्पुरत्या स्वरुपाचे पद असून या पदाच्या भरतीकरिता विद्यापीठ अथवा महाविद्यालयातील कोणत्याही स्वरुपाचा पूर्णवेळ अध्यापनाचा अनुभव ग्राह्य धरला जाईल.

२. किमान शैक्षणिक व इतर अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांनी प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता, संशोधन, अनुभव इत्यादी बाबींचे **'प्रपत्र-अ'** प्रमाणे गुणांकन करुन (एकूण गुण-५० पैकी) गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रत्येक रिक्त पदाकरिता किमान १० उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करावे. प्रत्येक आरक्षित प्रवर्गाचे उपलब्धतेनुसार किमान ०३ उमेदवारांचा यामध्ये समावेश सुनिश्चित करावा.

३. **'प्रपत्र-अ'** नुसार मिळालेले गुण मुलाखतीच्या किमान आठ दिवस अगोदर संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन पुढील दोन दिवसात संबंधित उमेदवाराकडून ई-मेलव्दारे हरकती मागवून त्या हरकतींचा निपटारा संबंधित विभागाच्या स्तरावर करण्यात यावा.

४. मुलाखतीस बोलावण्यात आलेल्या उमेवादांची मुलाखत (एकूण गुण-५० पैकी) **'प्रपत्र-ब'** मधील नमूद केलेल्या निकर्षांच्या आधारे घेण्यात यावी. मुलाखतीच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान सर्व उपस्थित निवड समिती सदस्यांची उपस्थिती अनिवार्य असून सर्व उपस्थित सदस्यानी दिलेल्या गुणांच्या सरासरी

गुणांवरुन (एकूण गुण-५० पैकी) मुलाखतीचा अंतिम गुणांकन तक्ता तयार करावा. प्रत्येक सदस्याने दिलेल्या गुणांचा तक्ता त्यांच्या स्वाक्षरीसह व अंतिम गुणांकन तक्ता सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह तयार करावा.

५. निवडीसाठीची गुणवत्ता यादी **'प्रपत्र-अ'** चे गुणांकन (एकूण गुण-५० पैकी) व **'प्रपत्र-ब'** चे गुणांकन (एकूण गुण-५० पैकी) यांची बेरीज (एकूण गुण-१०० पैकी) याप्रमाणे निश्चित करण्यात यावी.

६. मुलाखती पूर्ण झाल्याच्या दिवशी सर्व उमेदवारांनी प्राप्त केलेल्या **'प्रपत्र-अ'** चे गुण व **'प्रपत्र-ब'** चे गुण आणि अंतिम गुणांनुसार गुणवत्ता यादी संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन विहित पध्दतीने प्रशासन शिक्षक कक्षाकडे सादर करावी.

७. विषयनिहाय उपलब्ध जागांसाठी उमेदवारांची निवड करताना शासनाचे जाहिरात प्रसिध्द करते वेळी अस्तित्वात असलेले धोरण लागू राहील.

८. गुणवत्तेनुसार आरक्षण विचारात घेऊन विषयनिहाय पदांसाठी उमेदवारांची निवडसूची तयार करताना अंतिम टप्प्यात रिक्त असलेल्या राखीव प्रवर्गांकरिता रिक्त असणाऱ्या पदांच्या विषयासाठी त्या त्या प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने सदरची पदे रिक्तच राहण्याची शक्यता निर्माण झाल्यास, विभागांच्या तातडीच्या गरजेकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सदर पद निर्मिती केलेली असल्याने, संबंधित शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध पात्र उमेदवारांमधून प्रवर्गांची अदलाबदल करुन गुणवत्तेनुसार पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

९. सर्व विषयांची एकत्रित गुणवत्ता यादी व गुणवत्तेनुसार केलेली उमेदवारांची निवड सूची प्रशासन शिक्षक कक्षाव्दारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०. निवड समितीच्या अहवालास मा. कुलगुरू यांनी मान्यता दिल्यानंतर संबंधित विभागाचे विभागप्रमुख विहित नमुन्यामध्ये (**प्रपत्र-क**) संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश देतील.

११. अशी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही पदे रिक्त राहिल्यास संबधित विभागप्रमखांनी सुयोग्य पात्रताधारक उमेदवाराच्या नावाची आवश्यकत्या कागदपत्रासंह शिफारस केल्यास सदर रिक्त पदांवर संबधित उमेदवारांची नियुक्ती करण्याकरिता मान्यता देण्याचे अधिकार मा.कुलगुरु यांना प्रदान करण्यात यावेत.

**४. इतर तरतुदी :**

१) नियुक्त झालेल्या संबंधित उमेदवाराने विभागप्रमुखांनी वेळोवेळी सांगितलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत.

२) सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) या पदांची निर्मिती फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता **(सर्वसाधारणपणे दिनांक ०१ जुलै ते दिनांक ३१ मे)** असून कोणत्याही परिस्थितीत सदर पदांना मुदतवाढ देता येणार नाही. या कालावधीनंतरची या पदाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची जबाबदारी/दायित्त्व विद्यापीठावर राहणार नाही.

उपरोक्त नमूद शिफारशीप्रमाणे सहायक प्राध्यापक (करार पध्दतीने) (Assistant Professor (Contractual)) ही पदे शैक्षणिक वर्षांसाठी भरण्याकरिताची प्रक्रिया राबविण्यात येईल.

याबाबत यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेले परिपत्रक क्र.१९५/२०१९, जा.क्र.एटी/एचओडी/१०८५, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१९ रद्द समजण्यात यावे.

**(डॉ. प्रफुल्ल पवार)**
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.एटी/726
दिनांक : 15/०५/२०२६

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी : मा.विभागप्रमुख/मा.संचालक, सर्व शैक्षणिक विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.

प्रपत्र - अ

## (गुणवत्ता यादीकरीता गुणांकन)

## Academic Record and Research Performance (Part A):

| Sr. No. | | Academic Record and Research Performance | (Max. Marks) |
|---|---|---|---|
| A. | | Academic Records **(Max.Marks 35)** | |
| | **a.** | **Score for Marks obtained at UG and PG Degree Examinations** | **15** |
| | i. | Graduation (Max.Marks 05)<br>80% & Above = 05 Marks<br>60% to less than 80% = 04 Marks<br>55% to less than 60% = 03 Marks<br>45% to less than 55% = 02 Marks | |
| | ii. | Post Graduation (Max.Marks 10)<br>80% & Above = 10 Marks<br>60% to less than 80% = 08 Marks<br>55% to less than 60% = 06 Marks<br>50% to less than 55% = 04 Marks ( For reserved categories/ PWD) | |
| | **b.** | **Score for M.Phil and Ph.D. (M.Phil + Ph.D) (Max.Marks 15)** | 15 |
| | i. | M.Phil.<br>60% and above = 05 Marks<br>55% to less than 60% = 03 Marks | |
| | ii. | Ph.D. = 15 Marks | |
| | **c.** | **Score for JRF/NET/SET (Max.Marks 05)** | 05 |
| | i. | NET with JRF = 05 Marks | |
| | ii. | NET = 04 Marks | |
| | iii. | SET = 03 Marks | |
| | | | |
| B. | | **Teaching/Post Doctoral Experience (Max.Marks 05)** | **05** |
| | | Approved Teaching Experience as CHB, Full-time Approved/Unapproved experience of appointments as Post-doctoral / Contractual / Adhoc<br>**(1 mark per year)**<br>*However*, if the period of teaching/ Post-doctoral experience is less than one year then the marks shall be reduced proportionately.<br>However, the tenure shall not be less than 9 months (continus or broken) in respective Academic Year. | |
| C. | | **Research Performance (Max.Marks 10)**<br>(Research Publications, Books Authored and IPR generated) | **10** |
| | i. | Research Publications<br>Only Peer-Reviewed Journals shall be considered.<br>1 per Research Paper for Single author Publication.<br>In case multipal Authors, the principal author (first author or author for correspondence) shall get 60% marks and Co-authors shall get 40% marks. | |
| | ii. | Books Authored and Published by Reputed (National/International) Publisher (with ISBN)<br>2 marks per authored reference book<br>1 Mark per Edited Book/chapters in edited volume/Translated Book | |
| | iii. | IPR generated<br>2 marks per IPR (Patents/Copyright/Trademarks/Designs etc.) granted / awarded. | |
| | | **Total Marks** | **50** |

प्रपत्र - ब

## Interview Performance (Part B) :

**Part A : Assesment of Teaching Skills (20 Marks)**

| Sr.No. | Assesment of Teaching Skills | Marks |
|---|---|---|
| 1. | Modern Teaching – Learning Skills and Language Proficiency | **10** |
| 2. | Quality, Depth and Effectiveness of Delivery of Teaching Content | **05** |
| 3. | LOCF Approch in Teaching and Assessment | **05** |

**Part B : Interview Performance (30 Marks)**

| Sr.No. | Interview Performance | Marks |
|---|---|---|
| 1. | Depth of Domain Subject knowledge and understanting of recent developments in the field. | **10** |
| 2. | Critical Thinking, Logical Reasoning and Problem solving | **10** |
| 3. | Assesment of Co-curricular Activities and Knowledge of National Education Policy. | **10** |

| **Part B** | | Total |
|---|---|---|
| **Assesment of Teaching Skills** | **Interview Performance** | |
| Out of 20 Marks | Out of 30 Marks | Out of 50 Marks |

## Total (Part A & Part B):

| **Part A** | **Part B** | | **Total** |
|---|---|---|---|
| **Academic Record and Research Performance** | **Assesment of Teaching Skills** | **Interview Performance** | |
| Out of 50 Marks | Out of 20 Marks | Out of 30 Marks | Out of 100 Marks |

प्रपत्र - क

Ref. No.: Date :

**To,**

…………………………………

…………………………………

…………………………………..

…………………………………..

**Subject :** Appointment as Assistant Professor (Contractual)

**Ref. :** AT/………………., dated ………………

**Sir/Madam,**

With reference to your interview held on …………….. for the post of Assistant Professor
(Contractual) in the University Department of …………………………………..,
I am directed to inform you as follows :

**You are appointed as Assistant Professor (Contractual) on following terms and conditions :**

1. You have been appointed on consolidated honorarium of Rs 50,000/- [Rupees Fifty Thousand Only (fixed)] with no other benefits.
2. Your appointment is made only for the Academic Year 2026-27 i.e. up to 31/05/2027 from the date of your joining.
3. If you have been selected in reserved category, you have to submit your caste validity certificate in office within 6 months from the date of appointment order, failing which your services will be terminated.
4. You have to join duties within ten (10) days from the date of appointment letter.
5. You shall be required to take minimum 16 hours weekly teaching in the Department and also undertake the work assigned by the Head of the Department from time to time.
6. You will be permissible One Casual Leave for each month during an academic year.
7. You will not be entitled for any vacation leave and any other leaves.
8. Your service can be terminated without assigning any reason by giving one month's notice or one month's salary in lieu of the notice.
9. Your appointment is governed by and subject to provision of policy of the university notified by Circular No. /2026 (Ref.No. dated )
10. You are requested to join your duties immediately and submit your joining report in four copies along with undertaking in prescribed proforma.

**Head,**

**Department of ………………………………**

***<u>Copy forwarded with compliments to :</u>***

1. The Finance & Accounts Officer.
2. The Deputy/Assistant Registrar, Administration Teaching.
3. The Deputy/Assistant Registrar, Reservation Cell.